नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र.२६०**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ४ याची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव - रामराव आत्माराम लाहुडकर,
वय - ४६ वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. - चिंचोल, ता. मलकापुर जि.बुलडाणा

**<u>सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.डी.बी.वाकोडे यांचेमार्फत शपथेवर सुरु....</u>**

मी सदर प्रकरणातील आरोपींना ओळखतो. त्यांनी शेतक-यांकडून कापूस विकत घेतला म्हणून मी ओळखतो. या संदर्भात पोलीसांनी मला दि. २१.१२.२०२३ रोजी मलकापुर पोलीस शहर येथे गाडीचा पंचनामा करण्याकरिता बोलावले होते. मला किती वाजता बोलावले होते, हे मला सांगता येणार नाही. माझ्या सोबत दुसरे पंच हनुमान जगताप हे हजर होते. पोलीसांनी माझ्या समक्ष फोर्ड कंपनीची गाडी ज्याचा नोंदणीकृत क्रमांक ८००० ही जप्त केली. पोलीसांनी गाडी जप्त केल्याचा जप्ती पंचनामा माझ्या समक्ष केला. आता मला तो जप्त पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर पंच क्र. २ वर सही असून. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **<u>निशाणी क्र. २६१</u>** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१ व ४,११,१२ तर्फे विधीज्ञ श्री.एन.सी.जाधव यांचेमार्फत सुरु....</u>**

०२. सदर गाडी कोणाच्या मालकीची व ताब्यात होती, हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला फक्त बोलावले व माझ्या सह-या घेतल्या.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०३. चौकशी दरम्यान पोलीसांनी माझ वेगळे बयाण घेतले नव्हते. मी स्वतःहून पोलीसांना बयाण देण्याकरिता पत्र वगैरे दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी शेतक-यांकडून कापूस विकत घेतला म्हणून मी त्यांना ओळखतो असे आज पहिल्यांदा न्यायालयात

सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, शेतक-यांकडून कापूस घेतला म्हणून मी आरोपींना ओळखतो, असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २६१ व्यतिरिक्त माझ्या समोर पोलीसांनी इतर कोणतीही कार्यवाही केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, या व्यतिरिक्त माझी दुस-या पंचनाम्यावर सही नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....</u>**

०४. आरोपी क्र. २ व ३ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

०५. **उलटतपास नाकारला.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०६. आरोपी क्र. २ व ३ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.मराठे यांचेमार्फत सुरु....</u>**

०७. आरोपी क्र. २ व ३ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०८. आरोपी क्र. २ व ३ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारला.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.07.03 10:37:31 +0530

दिनांक : ०२/०७/२०२५

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर